# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः20.12.2025** **वारःशनिवार**

1. राज्यातल्या 23 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी आज मतदान, उद्या मतमोजणी
2. संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज अनिश्चित काळासाठी संस्थगित
3. पारंपरिक औषध पद्धतींची चिकित्सा सिद्ध करण्यासाठी विज्ञानाच्या माध्यमातून लोकांचा विश्वास जिंकण्याचं पंतप्रधानांचं आवाहन
4. राज्यात 15 ते 31 जानेवारी दरम्यान सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा राबविणार आणि
5. क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वीस षटकांचा अंतिम सामना जिंकून भारताचा 3-1 असा मालिका विजय

**मतदान-निवडणूक आयोग**

राज्यातल्या 23 नगरपरिषदा आणि नगरपंचायती तसंच 143 सदस्यपदांसाठी आज मतदान होणार आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून कर्मचारी काल संध्याकाळीच मतदान केंद्रांवर पोहोचले आहेत. राज्यातल्या 288 नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगानं 4 नोव्हेंबर 2025 रोजी जाहीर केला होता. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांमुळं गेल्या दोन डिसेंबरला होणारं मतदान राज्य निवडणूक आयोगानं 20 तारखेपर्यंत पुढे ढकललं होतं.

यवतमाळ, वाशीम, बारामती, अंबरनाथ, महाबळेश्वर, फलटण, कोपरगाव, देवळालीप्रवरा, पाथर्डी, नेवासा, फुरसुंगी- उरुळी देवाची, अनगर, मंगळवेढा, फुलंब्री, मुखेड, धर्माबाद, निलंगा, रेणापूर, बसमत, अंजनगाव सुर्जी, बाळापूर, देऊळगावराजा, देवळी, घुग्घूस या नगरपरिषदा आणि नगर पंचायतींसाठी हे मतदान होणार आहे. याशिवाय विविध जिल्ह्यातल्या 76 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधल्या 154 सदस्यपदांसाठीही आज मतदान होत आहे.

या सर्व जागा तसंच 2 डिसेंबरला मतदान झालेल्या ठिकाणांची एकत्रित मतमोजणी येत्या रविवारी, 21 तारखेला होईल. यासाठी संबंधित मतदार संघांमध्ये आज सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली असल्याची माहिती पुण्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. या निवडणुकीसाठी मतदारांनी न चुकता मतदान करावं, असं आवाहन डुडी यांनी केलं आहे.

**संसद**

संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज काल अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं. त्यामुळं संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा समारोप झाला. या अधिवेशनात सभागृहाच्या 15 बैठका झाल्या आणि त्यात 111 टक्के विधायक कामकाज झालं, अशी माहिती लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी लोकसभेमध्ये दिली.

राज्यसभेत सभागृहाच्या कामकाजात वारंवार व्यत्यय येत असल्याबद्दल अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सदस्यांनी आत्मपरीक्षण करावं, असं आवाहन त्यांनी केलं. सभागृहात 92 तास प्रत्यक्ष कामकाज झालं असून 121 टक्के उत्पादकता राहिल्याची माहिती उपराष्ट्रपतींनी दिली. जी-रामजी विधेयकावरच्या चर्चेसाठी मध्यरात्रीपर्यंत सभागृहाचं कामकाज चालल्याचा उल्लेख त्यांनी केला.

गेल्या 1 डिसेंबरपासून सुरु झालेल्या या हिवाळी अधिवेशनात वंदे मातरम्, निवडणूक सुधारणा, रोजगार, विमा क्षेत्रातल्या सुधारणा तसंच ऊर्जा सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा झाली. या अधिवेशनात एकूण पाच महत्त्वाची विधेयकं मंजूर

करण्यात आली. त्यात विकसित भारत रोजगार हमी उपजीविका विधेयक, शांती विधेयक, विमा सुधारणा विधेयक तसंच निरसन आणि सुधारणा विधेयकांचा समावेश आहे. या विधेयकांचं महत्त्व स्पष्ट करताना संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू म्हणाले...

**ये शीतकालीन सत्र बहुत बड़ा काम किया है। कोई लोग शायद अंदाजा नहीं होगा जो बिल्स पास किए गए हैं। इस सत्र में ये करोड़ों लोगों का जिंदगी सुधारने के लिए और भारत को विकसित राष्ट्र बनाने के लिए बहुत बड़ा काम आने वाला है। रिफॉर्मस की दृष्टि से ऐसा रिफॉर्म जो हर एक गरीब का जिंदगी को बदल देने वाला रिफॉर्मस रूरल इंडिया ग्रामीण भारत को सुधारने वाला रिफॉर्मस हर एक भारतीय की जिंदगी में लाभ पहुंचाने वाला रिफॉर्मस और भारत को महाशक्ति बनाने वाला रिफॉर्मस इस बार कदम उठाया गया है। इसलिए नरेन्द्र मोदी जी का तीसरे कार्यकाल में जैसे मोदी जी ने कहा तीन गुना स्पीड से आगे काम करेंगे तो नरेन्द्र मोदी जी का रिफॉर्मस एक्सप्रेस ये इस विंटर सेशन में बहुत तेजी से आगे बढ़ा है।**

**<u>मोदी-आयुष</u>**

पारंपरिक औषध पद्धतींची चिकित्सा सिद्ध करण्यासाठी विज्ञानाच्या माध्यमातून लोकांचा विश्वास जिंकण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्फत नवी दिल्ली इथं आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या जागतिक पारंपरिक औषध शिखर परिषदेच्या समारोप सत्रात अध्यक्षपदावरून मोदी बोलत होते. ते म्हणाले....

**प्राचीन परंपरा के साथ युवा शक्ति जुड़ रही है। इन सभी प्रयासों से ट्रेडिशनल मेडिसिन एक नई ऊंचाई की तरफ बढ़ती दिख रही है। साथियों आज पारंपरिक चिकित्सा एक निर्णायक मोड़ पर खड़ी है। दुनिया की बड़ी आबादी लंबे समय से इसका सहयोग लेती आई है लेकिन फिर भी पारंपरिक चिकित्सा को वो स्थान नहीं मिल पाया है। था जितना उसमें सामर्थ्य है। इसलिए हमें विज्ञान के माध्यम से भरोसा जीतना होगा। हमें उसकी पहुंच को और व्यापक बनाना होगा। ये जिम्मेदारी किसी एक देश की नहीं है। ये हम सबका साझा दायित्व है। आइए हम संकल्प लें कि पारंपरिक चिकित्सा को विश्वास, सम्मान और जिम्मेदारी के साथ मिलकर के आगे बढ़ाएंगे।**

यावेळी मोदी यांच्या हस्ते आयुष एकात्मिक पोर्टल आणि आयुष मार्कचं उद्घाटन झालं. या कार्यक्रमात 2021 ते 2025 या काळात योग प्रसार आणि विकासामध्ये उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींना पंतप्रधानांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

**<u>तटकरे</u>**

राज्यातल्या 29 महानगरपालिकांमध्ये महायुती म्हणून लढायची आपली तयारी आहे, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी काल मांडली. तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत निवडणूक लढायचा कोणताही प्रस्ताव नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यांचे समन्वयक, शहराध्यक्ष, जिल्हाध्यक्षांबरोबर झालेल्या आढावा बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याचं तटकरे यांनी सांगितलं. महायुतीबाबत निर्णय घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<u>अभिनंदन</u>**

सातारा जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या टोळीचा शोध लावल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस दलाचं अभिनंदन केलं. ते काल मुंबईत माध्यमांशी बोलत होते. अंमली पदार्थ तस्करी प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं नाव जाणीवपूर्वक जोडण्याचा प्रयत्न केला जात असून, हा प्रकार अत्यंत चुकीचा आणि निषेधार्ह असल्याचं फडणवीस म्हणाले. आतापर्यंत झालेल्या तपासात कुठेही शिंदे किंवा त्यांच्या कुटुंबाचा कुठलाही संबंध समोर आलेला नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, मुंबईत काल वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरमच्या उद्घाटन सत्रात मुख्यमंत्री सहभागी झाले होते. या परिषदे दरम्यान देशातली आघाडीची सिमेंट उत्पादक कंपनी असलेल्या बांगर उद्योगानं चंद्रपूर जिल्ह्यात दोन हजार कोटींच्या गुंतवणुकीचं स्वारस्य पत्र प्रदान केल्याची माहिती त्यांनी दिली.

**<u>सिकलसेल-तपासणी</u>**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीनं राज्यात 15 जानेवारी ते 31 जानेवारी 2026 या कालावधीत 'सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा' राबविण्यात येणार आहे. या कालावधीत सिकलसेल आजाराचं निदान, उपचार आणि संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा मोहिमेअंतर्गत राज्यातील सिकलसेल आजाराचं प्रमाण अधिक असलेल्या 21

जिल्ह्यांतील प्रत्येक नागरिकाची सिकलसेल तपासणी करण्यात येणार असून, एकही नागरिक सिकलसेल तपासणीपासून वंचित राहू नये, याची काटेकोर दक्षता सार्वजनिक आरोग्य विभागाकडून घेण्यात येईल.

**राष्ट्रीय कला उत्सव**

केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचा महत्त्वपूर्ण उपक्रम असलेला 'राष्ट्रीय कला उत्सव 2025' यावर्षी पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. उद्यापासून 23 डिसेंबरपर्यंत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी म्हणजेच यशदा इथं हा उत्सव होणार आहे.

**अपघात-नागपूर**

नागपूरच्या बुटीबोरी एमआयडीसी फेज-2 येथील अवाडा सोलर प्लांटमध्ये काल पाण्याची मोठी टाकी अचानक फुटल्याने 6 कामगारांचा जागीच मृत्यू झाला असून 9 जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींमध्ये काहींची अवस्था चिंताजनक असून जखमींची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, अग्निशमन दल आणि आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाले.

मृतांच्या वारसांना 5 लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकारतर्फे देण्यात येईल. याशिवाय, मृतांच्या वारसांना 30 लाख रुपये संबंधित कंपनी देणार असून, जखमींना 10 लाख आणि उपचारांचा खर्च देण्याचंही कंपनीनं मान्य केल्याचं, समाज माध्यमावर दिलेल्या माहितीमध्ये मुख्यमंत्री कार्यालयानं म्हटलं आहे.

**क्रिकेट**

दक्षिण अफ्रिकेविरुद्धची वीस षटकांच्या सामन्यांची क्रिकेट मालिका भारतानं 3-1 अशी जिंकली. काल अहमदाबाद इथं झालेल्या पाचव्या सामन्यात भारतानं दक्षिण अफ्रिकेवर 30 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भारताच्या संघानं 20 षटकांत 231 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल दक्षिण अफ्रिकेचा संघ 20 षटकांत 201 धावाच करू शकला.

19 वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेत काल झालेल्या उपांत्य सामन्यात भारताने श्रीलंकेचा 8 गडी राखून पराभव केला. तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात पाकिस्तानने बांगलादेशचा पराभव केला. त्यामुळे याही स्पर्धेत अंतिम सामन्यात भारत पाकिस्तान समोरासमोर येणार आहेत. हा सामना उद्या दुबईत होणार आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र हवामान कोरडं असून उद्याही असंच हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.